# विशेष पोलीस वार्तापत्र

दिनांक 30/04/2018

---

## पांढरकवडा येथे आय.पी.एल. सट्टयावर धाड,1,90610/- रु. चा माल जप्त

यवतमाळ जिल्हयामध्ये आयपीएल मधील क्रिकेट मॅचवर मोठया प्रमाणात सट्टा लागत असल्याने स्थानिक गुन्हे शाखे कडुन त्यावर आळा घालण्यासाठी माहीम सुरु असतांना दि. 29/04/2018 रोजी टोळी विरोधी पथक,स्थागुशा,यवतमाळ यांना खात्रीलायक गोपनिय माहीती मिळाली की, आयपीएल 11 सिझनचे सामन्यातील कोलकाता नाईट रायडर्स विरुध्द रॉयल चॅलेंज बंगलोर टिम च्य क्रिकेट मॅचवर हॉट लाईन /पोपट लाईन व मोबाईल फोन द्वारे सट्टा घेवुन पैशाची बाजी लावुन हारजित चा जुगार अभिनय ऊर्फ गुड्डु दिलीप रॉय,रा. पांढरकवडा हा त्याचे राहते घरी पांढरकवडा येथे जुगाराचा अड्डा भरवुन सट्टा खेळवत असल्याची खात्रीलायक गोपनिय माहीती मिळाल्यावरुन टोळी विरोधी पथक,स्था.गु.शा. यवतमाळ येथील पोउपनि/संतोष मनवर यांनी आठवडी बाजार ,पांढरकवडा येथे सापळा रचुन अभिनय रॉय याचे सट्टयाचे अड्डयावर धाड टाकुन अभिनय ऊर्फ गुड्डु दिलीप रॉय,रा. पांढरकवडा व त्याचे सट्टा घेणारे साथीदार नामे 1) सुनिल कल्यान सुलगेवार ,वय 37 वर्ष, 2) रवि खिल्लुमल दुंम्बा ,वय 30 वर्ष, 3) सागर कालीदास व्यास ,वय 26 वर्ष, सर्व रा. पांढरकवडा यांना सुध्दा अटक करण्यात आली. व तसेच अभिनय ऊर्फ गुड्डु दिलीप रॉय,रा. पांढरकवडा याचा क्रिकेट सट्टया मधील भागीदार रवि नंदकीशोर बोरेले,रा. पांढरकवडा याला सुध्दा अटक करण्यात आली व सट्टा लावण्याकरीता उपयोगात येणारे साहीत्य 1) एक व्हिडीओकॉन कंपनीची एलसीडी टिव्ही,साहीत्य कि. अं.31,200/- 2) हॉट लाईन /पोपट लाईन सुटकेस संच ( 10 मोबाईल रेकॉर्डर, रिसीव्हरसह ) कि. 35,000/- 3) सट्टा लावण्या करीता वापरण्यात येणारे वेगवेगळया कंपनिचे 14 मोबाईल कि. 91,000/- रु. 4) एक एचपी कंपनीचा लॅपटॉप कि. 25,000/- रु. 5) 03 कॅल्क्युलेटर कि. 300/-रु. 6) सट्टयाच्या नोंदी असलेले 04 कागद व नगदी 8,110/- रु. असा एकुण 1,90,610/- रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन पो.स्टे. पांढरकवडा येथे अप क्र. 351/2018 क. 4, 5, मुं.जु.का. सह. क. 109 भादंवि. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधीक्षक,यवतमाळ श्री. एम. राज कुमार, मा. अपर पोलीस अधीक्षक,यवतमाळ श्री.अमरसिंह जाधव ,श्री. मुकुंद कुलकणी,पोलीस निरीक्षक,स्था.गु.शा.यवतमाळ यांचे मार्गदर्शनाखाली टोळी विरोधी पथक,स्था.गु.शा. यवतमाळ येथील पोउपनि.संतोष मनवर, श्रीकांत जिंदमवार, सफौ/ऋषी ठाकुर,पोहवा/संजय दुबे,ड्रापोहवा/गणेश देवतळे,योगेश गटलेवार, पोना अमोल चौधरी,किरण श्रीरामे, आशिष गुल्हाने ,विनोद राठोड,राज कांबळे,श्रीधर शिंदे,आकाश सहारे, मपोशि/प्रियंका ढोके,मिनाक्षी जंगले यांनी पार पाडली.

**पोलीस निरीक्षक**
**स्था.गु.शा,यवतमाळ**